**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18.**

६७नागरवस्ती विकास योजना विभाग,

मुख्य प्रशासकीय इमारत, तळमजला, पिंपरी-४११०१८.

समुह संघटक या पदावर मानधनावर हंगामी नेमणूकीबाबत

**जाहिर प्रकटन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, महनगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा वस्तीपातळीवर प्रचार व प्रसार करणे, तसेच योजनांसंदर्भातील इतर सर्व कामकाजाकरीता "समुह संघटक" अभिनामाची पदे ०६ (सहा) महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरावयाची असून त्याकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | दरमहा एकत्रीत मानधन | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | समुह संघटक | १२ | र. रू. १०,०००/- | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पदवी<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील समाजकार्य विषयातील पदव्युत्तर पदवी परिक्षा (MSW) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, आणि MS Office/MSCIT परीक्षा उत्तीर्ण. |

सदर पदांसाठी खालील प्रमाणे आरक्षण लागू राहिल.

| अनु. जाती | अनु. जमाती | भज क | इमाव | शैसामाप्र | विमाप्र अ | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०३ | १२ |

अटी व शर्ती

१) मानधनावरील नेमणूका पूर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही प्रसंगी कायम नेमणूकीचा हक्क प्राप्त होणार नाही.
२) ज्या दिवशी महानगरपालिकेस सदर पदाची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटीसी शिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.
३) अर्जासोबत अलिकडे काढलेले स्वत:चे दोन रंगीत फोटो, शैक्षणीक अर्हते बाबतच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती तसेच लिफाप्यावर समुह संघटक पदासाठी अर्ज असे नमूद करावे.
४) मुलाखतीस येणेजाणेकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.
५) उपरोक्त पदाला विहित मान्यतेनूसार मानधन अदा केले जाईल.
६) सदर पदांची संख्या कमी जास्त होउ शकते.
७) उमेदवारास संगणक ज्ञान व संगणकावर प्रत्यक्ष कामकाज करणे बंधनकारक राहील.
८) आवश्यकते नुसार प्रतीक्षायादी तयार करणेत येईल.
९) प्रतीक्षा यादी ३ महिने कालावधीसाठी अंमलात राहील.

१०) ज्या उमेदवारांस शासकीय / निमशासकीय संस्थेमधील अशा कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असेल, अशा उमेदवाराबाबत (MSW) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण बाबतची अट शिथील केली जाईल. महानगरपालिका क्षेत्रामध्ये वास्तव्य असणा-या उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल.

११) समुह संघटकांस नेमणूक झालेवर र रू. १००/- च्या स्टँप पेपरवर स्वखर्चाने हमी पत्र देणे बंधनकारक राहील.

१२) उमेदवाराचा अर्ज छाननीमध्ये बाद झालेस कोणताही पत्रव्यहार केला जानार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी दि. १०/१०/२०१४ अखेरपर्यंत विहीत नमून्यातील अर्ज मा. सहा.आयुक्त,नागरवस्ती विकास योजना विभाग, तळमजला मुख्य इमारत, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८. यांचे कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्य प्रतीसह सादर करावेत. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे असल्याशिवाय अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पात्र उमेदवारांची मुलाखतपत्रे त्यांचे अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर पाठविणेत येतील.

**-सही-**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - १८.**

**जाहिरात क्र. ३१७/२०१४**
**क्र. नावियो/१/कावि/६७३/२०१४**
**दिनांक: ०५/०९/२०१४**

**-सही-**
**सहाआयुक्त .**
**नागरवस्ती विकास योजना विभाग**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी ४११०१८ -**

| पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

प्रति,

मा. सहा आयुक्त
नागरवस्ती विकास योजना विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४१११०१८

**विषय - मानधनावर तात्पुत्या स्वरूपात समुह संघटक या पदावर नेमणुकीबाबत**

संदर्भ - दिनांक ०६/०९/२०१४ रोजीच्या पुढारी, संध्यानंद व पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये तसेच महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या Web Site वर प्रसिध्द झालेली जाहिरात क्र. ३१७/२०१४

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी मानधन पध्दतीने समुहसंघटक या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

१) संपूर्ण नाव : -----------------------------------------------------------------------------------------
२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) : ---------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

मोबाईल नं. ----------------------------------------------------------------------------------------

३) जन्मतारीख : ------------------------- (DD/MM/YY) ४) लिंग : स्त्री / पुरूष
५) जात : ------------------------------- (सोबत प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक)
६) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

७) अनुभवाचा तपशील : ---------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------

वर नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरूध्द महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक : / /२०१४

सहपत्रे १)
२)
३)